Metric 7.1.3 - Quality audits on environment and energy regularly undertaken by the Institution. The institutional environment and energy initiatives are confirmed through the following

1. Green audit / Environment audit
2. Energy audit
3. Clean and green campus initiatives
4. Beyond the campus environmental promotion activities

Clarification Asked-

1) Provide the Policy document on environment and energy usage

2) Provide the Green Audit / Environment Audit /Energy Audit reports by involving the one external expert of the accredited Institution / Government / Govt. recognised organization.

3) Provide the Certificate from the auditing agency.

4) provide the Certificates of the awards received from the recognized agency.

5) Provide the Report on environmental promotional activities conducted beyond the campus with geo tagged photographs with caption and date.

6) Provide the Action taken reports and achievement report as clear and Green campus initiatives.

Response-

1) Certificate of Green audit / Environment audit and Energy audit are attached. (Appendix-I)

2) Reports of clean and green campus initiatives beyond the campus and environmental promotion activities are attached. (Appendix-II)

3) Certificates of the awards/ appreciation letters received from the recognized agency for the activities conducted are attached. (Appendix-III)

# Appendix-I

HIWARKAR ARTS , COMMERCE AND SCIENCE COLLEGE WADI, NAGPUR

Tah: Nagpur Dist. Nagpur, Pin:440023

Email: Hiwarkarcollege@gmail.com Tel:07104-22217

| ACTIVITY REPORT | |
|---|---|
| Academic year | 2023-2024 |
| Name of the activity | NSS Special Camp |
| Date of the Activity | 5/02/2024 to 11/02/2024 |
| Organizing By | NSS |
| Organizing unit / agency / collaborating agency | NSS unit , hiwarkar arts commerce and science college wadi, Nagpur . lava and Get Gram panchayat , lava |
| Number of students | 50 |
| Brief report | The aim of NSS special camp is to educate the people and empower them, with this moto the NSS unit of DDBASC , wadi comprising of about 50 students has organized a special camp in lava (khadgaon). The camp has been conducted under the supervision of college management and NSS program officer Dr. Rajeshwari Sangolkar. The NSS team members divided among themselves in different groups and conducted a 7 days special camp in the village.students conducted many activities. |

HIWARKAR ARTS, COMM. & SCIENCE COLLEGE, WADI, NAGPUR

Principal
Hiwarkar Arts, Comm
& Sci. College
Wadi Nagpur-23

# शैक्षणिक सत्र २०२३-२०२४ मधील

## नियमित कार्यक्रमाचा अहवाल

**वृक्षारोपण कार्यक्रम (१९ ऑगस्ट २०२३):-**

या दिवशी 'वृक्षारोपण दिन' यशस्वीरीत्या राबविण्यात आला. "हिवरकर कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय" वाडी, नागपूर येथील प्राचार्या माननीय डॉ.लता खापरे मॅडम तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग व विद्यार्थी या सर्वांनी मिळून महाविद्यालयाच्या परिसरामध्ये 'वृक्षारोपण दिन' साजरा केला. शिक्षकांनी विद्यार्थांना वृक्षालागवडीचे महत्व पटवून. तसेच कार्यक्रमाची सुरवात राष्ट्रगीताने झाली.

**स्वातंत्र्यदिनाचा सोहळा ( १५ ऑगस्ट २०२३):-**

|| स्वातंत्र्यदिन चिरायू होवो || या सदिच्छेने हिवरकर कला, आणि विज्ञान महाविद्यालय, वाडी येथे स्वातंत्र्यदिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे संचालक माननीय डॉ. प्रकाश हिवरकर सर यांची उपस्थिती लाभली. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले माननीय बोन्द्रे सर उपस्थित होते तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या माननीय डॉ. लता खापरे मॅडम यांची उपस्थिती लाभली. तसेच शिलादेवी कॉलेज ऑफ ऐज्युकेशन वाडी येथील व्यासपीठावरील उपस्थित सर्व मान्यवरांच्या प्रसंगी सर्व उपस्थितांनी उभे राहून राष्ट्रध्वजास मानवंदना देऊन राष्ट्रगीत गायले. तसेच कार्यक्रमाचे संचालन प्रा. राजेश्वरी सांगोळकर यांनी केलेव कार्यक्रमाचे कार्य प्रा.शुभांगी बनसोड यांनी पार पाडले.

**शिक्षकदिनाचा अहवाल (५ सप्टेंबर २०२३) :-**

|| गुरु परमात्मा परेशु || या उद्घोषणप्रमाणे शिक्षकाचे महत्व जाणून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांची जयंती संपूर्ण भारत भर 'शिक्षकदिन' म्हणून साजरी करण्यात येते. त्यालाच अनुसरून दिनांक ०४/०९/२०२१ ला हिवरकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वाडी, येथे देखील शिक्षकदिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून हिवरकर महाविद्यालयाच्या प्राचार्या माननीय डॉ. लता खापरे उपस्थित होत्या तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक माननीय डॉ. प्रकाश हिवरकर सर यांची उपस्थिती होती. त्यांनी विदयार्थीना मार्गदर्शन करतांना " शिक्षक हा देखील आजन्म विद्यार्थी म्हणूनच जगतो" व एका आदर्श शिक्षकाने एक आदर्श विद्यार्थी कसा घडविता येईल याबद्दल प्रयत्नशील राहावे असे सांगितले. कार्यक्रमाचे उत्तम संचालन प्रा. छाया गणवीर मॅडम यांनी केले तसेच कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रा. राजेश्वरी सांगोळकर यांनी केले.

**महात्मा गांधी व लाल बहादुरशास्त्री यांची जयंती (२ ऑक्टोंबर २०२३) :-**

जगाला सत्य व अहिंसेचा संदेश देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचेपूर्व प्रधानमंत्री लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंती निमित्त कार्यक्रम "हिवरकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वाडी येथे आयोजित करण्यात आले. तसेच या कार्यक्रमास प्रमुखअथिती व मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे संचालक म्हणून माननीय डॉ. प्रकाश हिवरकर सर व अध्यक्षस्थानी म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. लता खापरे मॅडम यांची उपस्थिती होती. तसेच विद्यापीठ गीताच्या समूह गायनाने सुरवात करून प्रा. राजेश्वरी लव्हात्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. याप्रसंगी विद्यार्थांनी सुंदर भाषणे व गांधीजींचे भजन गाऊन स्वतःचा उत्स्फूर्त सहभाग दर्शविला, कार्यक्रमाचे संचालन प्रा. वैशाली कुलालकर यांनी केले, त्यानंतर आभार प्रदर्शनाचे कार्य प्रा. छाया गणवीर यांनी पार पाडले. या प्रसंगी उपस्थित प्राध्यापकांनी स्वतःचे मते मांडली शेवटी समूह पसायदान गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**रासयो अंतर्गत स्वच्छता अभियान ( ११ ऑगस्ट २०२३):-**

वाढत्या प्रदूषणाच्या व रोगराईच्या काळात स्वच्छतेचे महत्व जाणून वाडी परिसरातील "हिवरकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील" रासेयो अंतर्गत स्वच्छता अभियान रासेयो अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. यावेळी रासेयो स्वयंसेवक व इतर विद्यार्थांनी कॉलेजच्या आजूबाजूचा परिसर तसेच पाण्याच्या टाक्या इ. स्वच्छ केल्या. जेणेकरून कॉलेज परिसरात मच्छरांमुळे रोगराईचा प्रादुर्भाव होऊ नये. या स्वच्छता अभियानात कॉलेजचे इतरही प्राध्यापक वर्ग तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच स्वच्छता कर्मचारी सुनीता काकू व शोभा काकू यांची मदत लाभली.

**वाचन प्रेरणा दिनाचा अहवाल :-**

मिसाईल मॅन" म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात आलेल्या वाचानदिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख अथिती व मार्गदर्शक म्हणून हिवरकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे संचालक माननीय डॉ. प्रकाश हिवरकर सर यांची उपस्थिती होती. तसेच अध्यक्षा म्हणून कॉलेजच्या प्राचार्या डॉ. लता खापरे मॅडम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अंकित जगताप सर यांनी केले. माननीय डॉ. हिवरकर सरांनी विद्यार्थांना कलामांचा वैज्ञानिक दृष्टीकोन समजावून सांगत " वाचाल तर वाचाल" हा मंत्र विद्यार्थांनी आजन्म पाळावा व स्वतःचा विकास साधावा असे आव्हान केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे संचालन करणारे प्रा.अंकित जगताप सर यांनी विद्यार्थांना डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलामांच्या प्रेरणादायी व्यक्तीमत्वापासून प्रोत्साहित होऊन आजन्म विद्यार्थी म्हणून जगण्याची व नियमितपणे वाचनाची सवय लावण्याची शपथ विद्यार्थांना दिली. प्रा.दिव्या रेवतकर यांनी

आभारप्रदर्शन पार पाडले. शेवटी विद्यापीठीय गीताच्या समूहगायानाने कार्यक्रमाची सागता करण्यात आली.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती (३० ऑक्टोंबर २०२३):-**

सर्वधर्म समभाव व ग्रामशुद्धीकरण शिकवण देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम दिनांक ३०/१०/२०२२ ला " हिवरकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वाडी येथे साजरा करण्यात आला. तसेच संस्थेचे संचालक माननीय डॉ. प्रकाश हिवरकर सर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. तसेच प्रमुख अथिती म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. लता खापरे मॅडम यांची उपस्थिती होती. त्यांनी विद्यार्थांना तुकडोजी महाराजांचा जीवन परिचय करून देत त्यांची ग्रंथसंपदा भजन व कीर्तनांची ओळख करून दिली. कार्यक्रमाची सुरवात विद्यापीठीय गीताने झाली. याप्रसंगी विद्यार्थीनी उत्कृष्ट भजने सादर केली व भाषणे दिली. कार्यक्रमाचे संचालन प्रा.राजेश्वरी लव्हात्रे मॅडम यांनी केले व आभारप्रदर्शन प्रा. छाया गणवीर मॅडम यांनी केले. यावेळी उपस्थित प्राध्यापकांनी स्वतःचे विचार मांडले. शेवटी पसायदान गायनानेकार्यक्रमाची सांगता झाली.

**महात्मा ज्योतिबा फुले पुण्यायिती ( २१ नोव्हेंबर २०२३):-**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मुर्तीदिनाचा कार्यक्रम ३०/१/२०२३ ला "हिवरकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आले. महाविद्यालयीन प्राचार्या माननीय डॉ. लता खापरे मॅडम या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या व प्रमुख पाहुणे म्हणून शिलादेवी कॉलेजच्या प्राचार्या माननीय डॉ. लीना तायवाडे मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन-प्रा.छाया गणविर मॅडम यांनी केले व आभारप्रदर्शन प्रा. राजेश्वरी लव्हात्रे मॅडम यांनी केले. प्रा. छाया गणवीर मॅडम व प्रा.अंकित जगताप सर यांनी स्वतःचे मनोगत मांडले.

**संविधान दिनाचा अहवाल (२६ नोव्हेंबर २०२३) :-**

दिनांक २६ नोव्हेंबर ला संविधान दिवसाचा कार्यक्रम हिवरकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वाडी येथे आयोजित करण्यात आले. संविधान दिनाच्या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्या माननीय डॉ. लता खापरे मॅडम अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या. तसेच प्रा. छाया गणवीर मॅडम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरवात केली. कार्यक्रमाचे अध्यक्षा डॉ. लता खापरे मॅडम यांनी संविधानाचा इतिहास सांगून संविधानाचे महत्व विद्यार्थांना समजावून दिले. तसेच या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रा. निशा पिसे मॅडम यांनी केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यानंतर कार्यक्रम कार्यक्रम अधिकारी तसेच रासेयो चे स्वयंसेवक संविधान रॅलीमध्ये सहभागी झाले.

**महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम (६ डिसेंबर २०२३) :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मुर्तीस विनम्र अभिवादन करण्याकरितामहापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम " हिवरकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वाडी येथे आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या माननीय डॉ. लता खापरे मॅडम उपस्थित होत्या. प्रा. मंगेश सुखदेवे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाचा परिचय विद्यार्थाना करून दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय डॉ. लता खापरे मॅडम यांनी बाबासाहेबांनी दलित बांधवांसाठी घेतलेले श्रम व अविरत शिक्षण घेण्याची वृत्ती याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच दलित उत्थानासाठी बौद्ध धर्माची शिकवण देऊन समाज उभारण्याकरिता केलेले प्रयत्न यावर प्रकाश टाकला. विद्यार्थांनी कार्यक्रमात सुंदर भाषणे केली. तसेच उपस्थित प्राध्यापक वर्ग प्रा.अंकित जगताप सर व प्रा. स्नेहा मेहरे मॅडम यांनी आपली मते मांडली. संचालन प्रथम वर्षाची विद्यार्थिनी राणी चव्हाण हिनी केले. तसेच कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन बी.ए द्वितीय वर्षाची विद्यार्थी समृद्धी गणविर हिनी केले.

**मराठी भाषा दिवस (२७ फेब्रु 202४):**

जागतिक मराठी भाषा दिवस 27 फेब्रुवारी हा दिवस मराठी साहित्याचा मानदंड वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस हा दिवस मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला. कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून प्रा. डॉ. लता खापरे मॅडम तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रकाशहिवरकर सर उपस्थित होते. सुरुवातीला विद्यार्थ्यांनी मराठीतील उघड्यावर शौचास बसू नका, शौचालयाचा वापर करा " कविता वाचन केले. काही विद्यार्थ्यांनी मराठीची आवश्यकता मराठीचे महत्व सांगणारी दोन पथनाट्ये सादर केली. कार्यक्रमाचे संचालन बी.कॉम द्वितीय वर्षाची विद्यार्थी प्रतीक्षा सिहाणे केले व आभार प्रदर्शन कार्य बी.ए.द्वितीय साक्षी रागीट यांनी केले.

**महिला दिनाचा कार्यक्रम :(८ मार्च 202४)**

दि.८ मार्च २०२४ ला जागतिक महिला दिननिमित्त शिलदेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महिला दिनाच्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून. डॉ. लीना तायवाडे विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमास अध्यक्षा म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. लता खापरे हया होत्या. प्रमुख अतिथि यांनी विद्यार्थ्यांना महिला दिनाचे औचित्य साधुन महिला सशक्तीकरणाचे महत्व विद्यार्थ्यांना समाजवून सांगितले. कार्यक्रमाचे संचालन बी.कॉम. प्रथम वर्षाचा विद्यार्थी आकाश गोपाले यांनी केलें. व अभारप्रदर्शन बी.ए प्रथम वर्षाची विद्यार्थिनी तनुश्री खंडाते हिनी केले.

Principal
Hiwarkar Arts. Comm
& Sci. College
Wadi Nagpur-23

**हिवाळी विशेष शिबिर विश्लेषण अहवाल**

**२०२३-२०२४**

**सोमवार दि. 05 फेब्रुवारी 2024 ला सकाळी 7.00** वाजता शिलादेवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सर्व शिबिरार्थी विद्यार्थी एकत्र होऊन 9.00 वाजता शिबीराच्या मुक्काम स्थळी रवाना झाले. कळंबी येथे पोहचल्या नंतर विद्यार्थींनी पाण्याची सोय करणे, तेथील परिसराची स्वच्छता, राहण्याची सोय इत्यादीचे नियोजन कार्यक्रम अधिकाऱ्याच्या देखरेखी खाली केले व त्यानुसार विद्यार्थ्यांचे काम वाटप, गट विभागणी इत्यादी करण्यात आले.

**उद्घाटन सोहळा :**

**मंगळवार दि. 6/02/2024** ला हिवाळी शिबीरांचे उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला. या उद्घाटन सोहळ्या करीता उद्घाटक म्हणून ग्रामपंचायतेतील सरपंच श्री.विनोद कृष्णाजी भोयर यांना आमंत्रित करण्यात आले होते. तसेच उद्घाटन कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मा. श्री. छत्रपती मोहोड उपसरपंच ग्रामपंचायत कळंबी लाभले प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री सुरेश नामदेवराव मलवे(गीतकार) ठाणेगाव, वर्धा प्राचार्या डॉ. सुरेखा शर्मा शीलादेवी कॉलेज ऑफ एज्यूकेशन वाडी, तसेच प्राचार्या डॉ.लता खापरे हिवरकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाडी सर्व कॉलेजचे प्राध्यापकवर्ग व मान्यवरांची कार्यक्रमाला उपस्थिती लाभली.

सरस्वती पूजन करण्यात आला. पाहुण्याचे स्वागत झाले. प्रमुख पाहुणे मलवे सर यांनी विद्यार्थानमध्ये राष्ट्रीय मूल्य रुजविण्यासाठी राष्ट्रीय गीत सादर केले. पाहुण्यांचे मार्गदर्शन झाले.

**गावागावासी जागवा । भेदभाव समुळ मिटवा ।।**

**उजळा ग्रमोन्नती दिवा । तुकड्या म्हणे ।। 1 ।।**

अशाप्रकारे NSS गीतांनी कार्यक्रमाची उत्तम सुरवात झाली. कोमल जुवारे या शिबिरार्थी विद्यार्थीनीने सुत्रसंचालन केले व विधी डंभारे या विद्यार्थीने कार्यक्रमाचे आभरप्रदर्शन केले. कार्यक्रमास सर्व शिबीरार्थी विद्यार्थी गावकरी व इतर प्राध्यापक वृंदाची उपस्थिती होती.

**बुधवार दि.7 फेब्रुवारी 2024:**

शिबीराचा दुसरा दिवस असल्यामुळे या दिवशी शिबीरार्थींनी स्वच्छता अभियानाचा दिवस सकाळपासून (वेळ ९.०० ते १२००) विद्यार्थी सर्व कामाला जोमाने लागले होते. कार्यक्रम अधिकाऱ्या समवेत सर्व सहकारी मिळून ग्राम स्वच्छतेचा प्रारंभ केला. गावातील सर्व रस्ते, स्वच्छ

करुन साचलेल्या कचऱ्याची विल्हेवाट शिबीरार्थीनी व्यवस्थित लावलीती. त्यानंतर गावभर स्वच्छता दिंडी काढण्यात आलेली आहे.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रामध्ये सायंकाळी ६.०० ते १०.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. लीना तायवाडे शीलादेवी कॉलेज ऑफ एज्युकेशन वाडी नागपूर होत्या. अध्यक्ष म्हणून कळंबी चे सरपंच श्री. विनोद कृष्णाची भोयर उपस्थित होते. या सत्राचे सुत्रसंचालन कोमल जुवारे आणि आकाश गोपाले यांनी केले आणि कार्यक्रमाची सांगता प्रा. छाया गणवीर यांनी केले.

**गुरुवार दि.8 फेब्रुवारी 2024:-**

कार्यक्रमाची सुरवात 'योगा' पासून करण्यात आली. त्यानंतर 'पाणी वाचवा कार्यक्रमा अंतर्गत पथनाट्यादवारे गावकऱ्यांना पाण्याचे महत्व सांगण्यात आले. याचे अध्यक्ष प्रा. छाया गणवीर होत्या. भोजनावकाश आटोपल्यानंतर कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रामध्ये सादर करण्यात आले. गावातून विविधेत एकता प्रभातफेरी काढण्यात आली आणि प्रत्येक घरी शिबिरार्थी जाऊन व्यसनबंदी, स्त्रियांचे प्रश्न, मतदानाचा अधिकार या विषयावर जनजागृती करण्यात आली त्याच बरोबर या प्रश्नावर पथनाट्य. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राणी चव्हाण आणि विशाखा रागीट हिने केले होते

**शुक्रवार दि.9 फेब्रुवारी 2024**

कार्यक्रमाच्या चौथ्या संत्रामध्ये 'वृक्षारोपण' आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून श्री.विनोद कृष्णाजी भोयर उपस्थिती होते.प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रकाश हिवरकर होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राणी चव्हाण आणि विशाखा रागीट हिने केले होते.

**शनिवार दि. 10 फेब्रुवारी 2024**

कार्यक्रमाची पाचव्या दिवशी जिल्हा परिषद शाळा कळंबी येथील विद्यार्थांबरोबर राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विद्यार्थांनी विविध खेळ खेळण्यात आले.या कार्यक्रमात अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत साबळकर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन निधी दाम्भारे आणि आभार प्रदर्शन रोशन प्रसाद केले होते.

**रविवार दि. ११ फेब्रुवारी 2024**

सातव्या दिवशी सकाळी ९.०० वाजता साईनाथ ब्लड बँक सक्करधरा नागपूर, या संस्थेने गावात 'रक्तदान शिबीर' आयोजित करण्यात आला अध्यक्ष म्हणून श्री.छत्रपती मोहोड होते. या शिबिरात गावातील अनेक लोकांनी मदत केली. कार्यक्रमाचे संचालन तनुश्री खंडाते हिने केले आणि आभार प्रदर्शन प्रक्तीक्षा शिहानें हिने केले

**कार्यक्रमाच्या दुसर्या सत्रात समारोप:**

हा शिबीराचा शेवटचा दिवस असल्यामुळे गावातील सर्वमान्यवारांना आमंत्रित करुन त्यांचे आभार मानून सर्व NSS स्वयंसेवकांनी शिबीर स्थळातूनप्रस्थान केले. अशाप्रकारे शिबीराचा समारोप झाला.

## शिबिरातील दिनचर्या

- सकाळी 6 ते 7 सकाळी उठणे, प्रातः विधी
- सकाळी 7.30 -प्रार्थना योगासने
- सकाळी 11 ते 01 उद्बोधन कार्यक्रम
- दुपारी 1 ते 2 - भोजन अवकाश
- दुपारी 3 ते 4 विशेष मार्गदर्शन शिबीर
- दुपारी 4 ते 7 विविध खेळ, मनोरंजनात्मक ,सांस्कृतिक कार्यक्रम

Principal
Hiwarkar Arts Comm
& Sci. College

SHEELA MULTIPURPOSE SOCIETY

# HIWARKAR ARTS, COMMERCE & SCIENCE COLLE

WADI, NAGPUR-440 023
E-mail : hiwarkarcollege@yahoo.com
hiwarkarcollege@gmail.com
NAAC ACCREDITATION-B+

Coll. Ph. : 07104-222175 Coll. Code :

संदर्भ :- कॉलेज/२०१४/२०२४ दि: २१/०३/२०२४

प्रति,

मा. समन्वयक ,
राष्ट्रीय सेवा योजना
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

**विषय :- हिवाळी शिबिराचा (राष्ट्रीय सेवा योजना) अहवाल सादर करण्याबाबत**

मा.महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते कि, हिवरकर आर्ट्स, कॉमर्स सायन्स कॉलेज,वाडी, नागपूर येथिल राष्ट्रीय सेवा योजना (हिवाळी शिबिर) ०५ फेब्रुवारी २०२४ ते ११ फेब्रुवारी २०२४ ला घेण्यात आले होते त्याचा अहवाल पाठविण्यात येत आहे स्वीकृत करावी. हि विनंती

धन्यवाद!

सहपत्रे:

१) अहवाल
२) शिबीर फोटो Received

## विशेष सहकार्य

प्रा. कुलारकर, प्रा. ढोबळे, प्रा. साखरे, प्रा. गाकरे, प्रा. मेहरे.
तसेच विद्यार्थी शिवानी, उमा, राणी चव्हाण,

**आपले विनीत**

मा. प्राचार्या डॉ. लता खापरे
हिवरकर कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, वाडी, नागपूर.

**शिबिर सहाय्यक**

प्रा. गणवीर, प्रा. सांगोलकर, प्रा. कुलारकर, प्रा. बनसोड,
प्रा. पिसे, प्रा. मेहरे, प्रा. साखरे, प्रा. जगताप, प्रा. मनोहर.

**कार्यक्रम अधिकारी**

प्रा. राजेश्वरी सांगोळकर

**विद्यापीठ प्रतिनिधी**

समृद्धी गणवीर
साक्षी रागीट

**कार्यक्रम समन्वय**

प्रा. छाया गणवीर, प्रा. अंकित जगताप

**शिबीर संयोजक**

-प्रा. डॉ दीपक जेजानी, प्रा. शुभांगी बनसोड

**महाविद्यालय प्रतिनिधी**

पवन रामटेके
आकाश गोपाले

**स्वागत समिती व प्रसिद्धी प्रमुख**

प्रा. राहुल कोसे, प्रा. अर्चना मनोहर

**क्रीडा व शरीर स्वास्थ उपक्रम प्रमुख**

प्रा. पंकज मंडपे, प्रा. निशा पिसे

**विद्यार्थी प्रतिनिधी**

विशाखा रागीट
तनुश्री खंडाते

**सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख**

**।। गाव हा विश्वाचा नकाशा गावाकरून देशाची परिक्षा**
**गाव भंगता येईल अवदसा देशामध्ये ।।**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर.
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
महाविद्यालयीन विशेष हिवाळी शिबीर - २०२३-२०२४
स्वच्छ भारत व आरोग्य जागृतीसाठी युवाशक्ती
व भारतीय संविधानाचा जागर

**संयोजन**

हिवरकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडी नागपूर.

**स्थळ**

**मु.पो.कळंबी ता. कळमेश्वर, जि. नागपूर**
**दि. ५ फेब्रुवारी २०२४ ते ११ फेब्रुवारी २०२४**
**२०२३-२०२४**

**निमंत्रण**

श्री/श्रीमती....................................................

....................................................सा.न.वि.वि

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत व
राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विशेष हिवाळी शिबीराचे आयोजन
ग्राम कळंबी, नागपूर येथे आयोजीत केले आहे.
दि. ५ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी २०२३-२०२४

**"खरे काम निष्काम ही ग्रामसेवा । झडू सर्व भावे करू स्वर्ग गावा ।**

**कळो हे वळो, देह कार्या पडू दे । घडू दे प्रभू एवढे घडू दे।"**

सप्रेम नमस्कार,

ग्रामोक्ती म्हणजे ग्राम विकास होवून ग्राम परिवर्तन होईल असेराष्ट्रपिता महात्मा गांधी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार होत. ग्राम विकासाचे हाक ऐकुन युवा शक्ती जागृत होणे ही काळाची गरज आहे या दृष्टीने ग्राम स्वच्छ व आरोग्य जागृती करिता युवा शक्ती या महाविद्यालयीन शिबीराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागात केले आहे. स्वच्छता व आरोग्या कडे दुर्लक्ष झाल्यामुळे गावे बकाल होत चालली आहे. या करिता ग्रामोन्नतीचा दिवा पेटवून गाव सुंदर करण्याचा संदेश युवक युवती व ग्रामस्थांना देण्याकरिता हिवरकर कला, वाणिज्स व विज्ञान महाविद्यालय, वाडी, नागपूर द्वारा या शिबीराचे आयोजन होत आहे. या शिबीरात आपण अगत्याने उपस्थित राहावे ही विनंती.

**कार्यक्रमाची रूपरेषा**

**सोमवार दि.५ फेब्रुवारी २०२४**

शिबीरार्थीचे आगमन व पुर्व तयारी

**उद्घाटन समारंभ**

**मंगळवार दि ६ फेब्रुवारी २०२४**

वेळ दुपारी २.०० वाजता

उद्घाटनः श्री. विनोद कृष्णाजी भोयर (सरपंच ग्रामपंचायत कळंबी, नागपूर.)

**अध्यक्ष**

श्री. छत्रपतीजी मोहोड (उपसरपंच ग्रामपंचायत कळंबी, नागपूर.)

**प्रमुख पाहुणे**

श्री. सुरेश नामदेवराव मलवे (गीतकार)

(ठाणेगाव, ता. कारंजा, जि. वर्धा.)

**मुख्यध्यापक**

मा. श्रीकांत साबळकर

जिल्हा परिषद शाळा, कळंबी

**प्राचार्या**

डॉ. सुरेखा शर्मा

शिलादेवी कॉलेज ऑफ एज्युकेशन, वाडी, नागपूर

प्राचार्या डॉ. लता खापरे

हिवरकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडी, नागपूर

स्वचरित देशभक्तीपर गीत (वेळ दुपारी ४.०० वाजता)

"गावा गावासी जागवा। भेदभव समुळ मिटवा।

उजळा ग्रामोन्नतीचा दिवा तुकडया म्हणे।"

बुधवार दि. ७ फेब्रुवारी २०२४ **वेळ सकाळी ९.०० ते १२.०० वाजता**

स्वच्छ भारत अभियान व प्रभात फेरी (वक्ते अंकित जगताप)

**वेळ सायंकाळी ६.०० ते १०.०० वाजता** (सांस्कृतिक कार्यक्रम)

प्रमुख पाहुणे डॉ. लीना तायवाडे

शीलादेवी कॉलेज ऑफ एज्युकेशन, वाडी नागपूर.

गुरुवार ८ फेब्रुवारी २०२४ **वेळ सकाळी ११.०० वाजता** (योगा)

वेळ दुपारी ३.०० वाजता (विविधतेत एकता प्रभात फेरी.)

**शुक्रवार ९ फेब्रुवारी २०२४ (वृक्षारोपण,) वेळ सकाळी ११.०० वाजता**

**प्रमुख पाहुणे कॉलेजचे संचालक डॉ. प्रकाश हिवरकर**

**अध्यक्ष** श्री. विनोद कृष्णाजी भोयर (सरपंच ग्रामपंचायत कळंबी, नागपूर.)


**शनिवार १० फेब्रुवारी २०२४ विद्यार्थ्यांचे खेळ (जिल्हा परिषद शाळा कळंबी, नागपूर.)**

**रविवार ११ फेब्रुवारी २०२४ वेळ सकाळी ९.०० वाजता**

**साईनाथ ब्लड बँक सक्करधरा नागपूर.**

Principal
Hiwarkar Arts, Com
& Sci. College
Wadi Nagpur-23




HIWARKAR ARTS, COMM. & SCIENCE
WADI

Principai
Hiwarkar Arts, Comm.
& Sci. College
Wadi, Nagpur-23







WADI

Principal
Hiwarkar Arts, Comm
& Sci. College
Wadi, Nagpur-23







ARKAR ARTS, COMM. & SCIENCE
WADI
NAGPUR

Principal
Hiwarkar Arts, Comm
& Sci. College
Wadi, Nagpur-23







ARTS, COMM. & SCIENCE
WADI

Principal
iwarkar Arts, Comm
& Sci. College
Wadi, Nagpur-23




WADI

Principal
Hiwarkar Arts, Comm
& Sci. College
Wadi, Nagpur-23